कार्य अहवाल

जपेन मी तुमच्या विश्वासाला
जागेन तुम्हाला दिलेल्या शब्दाला



# वचनपुर्ती



## श्री.भुपेंद्र मुरलीधर मोरे

संस्थापक अध्यक्ष : शिवराज्य समुह, पुणे शहर
सामाजिक कार्यकर्ते

प्रिय मतदार बंधु–भगिनींनो,
सप्रेम नमस्कार,

मी भुपेंद्र मुरलीधर मोरे, आपल्या नऱ्हेगाव व धायरी परिसरात गेल्या १० वर्षापासून सामाजिक, व्यावसायिक व राजकीय क्षेत्रात सक्रीय आहे. वेगवेगळे उपक्रम, सामाजिक कामे आणि प्रत्यक्ष भेट या माध्यमातून आपण मला ओळखत आहात. कोणतेही पद नसतानाही मी गेली दशकभर केलेल्या कार्याचा अहवाल आपल्या समोर ठेवत आहे. जिथे कमी तिथे मी म्हणत नेहमीच आपल्यासोबत खंबीरपणे उभा राहीलो आहे.

तसं पहाता मला लहानपणापासूनच समाज कार्याची आवड होती. शालेय शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांना एकत्रित करून शाळा व कॉलेजमधील प्रश्न सोडविले. त्यानंतर मी व्यवसायामध्ये प्रवेश केला. अनंत अडचणी व समस्यांचा सामना करीत मी व्यवसायामध्ये चांगल्या प्रकारे यशस्वी ठरलो. व्यवसायातील प्रगती होत असताना मी कधीच सामाजिक भान सोडलं नाही. त्यादरम्यानही मी अनेक सामाजिक कार्य करून समाजाला हातभार लावला आहे. तसेच सर्व पक्षीय आमदार, खासदार, नगरसेवक, नेतेमंडळी यांना भेटून आपल्या परिसरातील समस्या सोडविण्यासाठी पाठपुरावा करीत असतो. वेळप्रसंगी आमदार व खासदार आणि लोकप्रतिनिधींना समस्यांची पहाणी करण्यासाठी प्रत्यक्ष जागेवर नेवून कामे मार्गी लावली आहेत. शिवाय समाजातील अनिष्ट व अनैतिक गोष्टींविरुद्ध आवाज उठविण्यासाठी विविध आंदोलने, मोर्चे व धरणे यांचे आयोजन केले आहे. व यातुन अनेक अन्यायग्रस्त व अत्याचारग्रस्त नागरीकांना न्याय मिळवून दिला आहे.

मात्र जनतेसाठी अहोरात्र सामाजिक काम करीत असताना राजकीय पद किंवा लोकप्रतिनिधी नसल्यामुळे मला अनंत अडचणींना सामोरे जावे लागत आहे. तसेच आपला नऱ्हे आणि धायरीचा परिसर हा झपाट्याने वाढत असल्याने हा भाग शहरातील महत्वाचे उपनगर मानले जात आहे. जलद नागरीकरणामुळे आपल्या परिसरातील काही समस्या नव्याने निर्माण होत आहेत. या समस्या सोडविण्यासाठी अनुभवी व अभ्यासू व्यक्तीचं आपला प्रतिनीधी असणं अतिशय आवश्यक आहे.

मी आपल्या संपूर्ण परिसराचा सर्वांगीण व समतोल विकास करण्यासाठी आदर्श व्हिजन तयार केलं आहे. त्या व्हिजनद्वारे मला आपला परिसर आदर्श व रोल मॉडेल बनवायचा आहे.



# मनोगत



सेवा
संकल्प
विकास

# सामाजिक व राजकीय कार्यांचा थोडक्यात आढावा

- पक्षाचा वर्धापन दिन सोहळा
- दुर्बल घटकांना मदत
- दुष्काळग्रस्त मदत अभियान
- सन्माननीय गाठीभेटी
- सुप्रियाताईंचा प्रचार यशस्वी सहभाग
- जन आक्रोश आंदोलन
- सीसीटीव्ही हस्तांतरण सोहळा
- शिवजयंती
- रस्ते आंदोलन
- समाजसेवेसाठी कायम अग्रेसर
- छत्रपती संभाजी महाराज जन्मसोहळा
- छत्रपती संभाजी महाराज जन्मसोहळा
- महा ई सेवा केंद्राचे उदघाटन
- गोरगरीब दुकानदारांसाठी केलेले आंदोलन
- एम.एस.सी.बी. आंदोलन
- सोसायटी बैठक व नागरी सोहळा
- गणेशोत्सवादरम्यान सदिच्छा भेट
- होम मिनिस्टर
- स्वप्नपूर्ती महिला फाऊंडेशनमार्फत आयोजित उपक्रम
- समाजातील गोरगरीब मुलांना शैक्षणिक साहीत्य वाटप
- लहान मुलांसाठी चित्रकला स्पर्धा
- जन आरोग्य आंदोलन
- महिला फाऊंडेशनमार्फत वर्धापन दिनानिमित्त हळदी कुंकु समारंभ
- कोरोना काळात मोफत फूड पॅकेटस वाटप
- रुग्णवाहीका लोकार्पण सोहळा
- व्यापाऱ्यांसाठी मोफत अँटीजेन टेस्ट
- आरोग्य तपासणी शिबीरांचे आयोजन
- कोरोना काळात नागरीकांना अन्नधान्य वाटप
- कोविड यौद्ध्यांचा सन्मान
- एक मदत अशीही
- राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंतीनिमित्त मोफत लसीकरण
- रक्तदान शिबीरांचे आयोजन
- लोकप्रिय आमदार सुनिल (आण्णा) शेळके यांच्या जन्मदिवसानिमित्त
- मोफत कोविड लसीकरण
- ६५०० लोकांना मोफत कोविड लसीकरण
- विविध वार्तापत्रांनी कामाची घेतलेली दखल













## मतिमंद व दुर्बल घटकांना मदत

महाराष्ट्राचे लाडके व कार्यक्षम उपमुख्यमंत्री मा.ना.अजितदादा पवार साहेब यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून समाजातील दुर्बल व मतिमंद मुलांसोबत एक दिवस त्यांच्यासोबत राहून भुपेंद्रजींनी सर्वतोपरी मदत करण्याचा प्रयत्न केला.

सेवा संकल्प विकास











## दुष्काळग्रस्त मदत अभियान

शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे, मात्र दुष्काळासारख्या संकटात तो कोलमडून पडला होता. आपण शहरात राहत असलो तरी सुद्धा ग्रामिण भागातील शेतकरी राजा आणि नागरिक यांच्या हालअपेष्टांचा विचार केला पाहिजे. हाच विचार मनात ठेऊन भुपेंद्रजी यांनी दुष्काळग्रस्त भागातील नागरिकांसाठी मदत अभियान राबविले होते.

सेवा
संकल्प
विकास








## सन्माननीय गाठीभेटी

भुपेंद्रजी यांचे अनेक मान्यवर मंडळी, राजकीय नेते, उच्च पदस्थ अधिकारी यांच्याशी निकटचे संबंध आहेत. तसेच, परिसरातील नागरिकांच्या समस्या व प्रश्न सोडविण्यासाठी मान्यवरांना ते भेटत असतात.

सेवा संकल्प विकास













## रस्ता बंद आंदोलन

अस्ताव्यस्त कचरा, तुंबणारे पाणी
रस्त्यावर वाहणारे ड्रेनेज, नादुरुस्त रस्ते,
नालेसफाई, वागतुक कोंडी यातून झोपलेल्या
प्रशासनाला जाग येण्यासाठी रस्ता बंद आंदोलन













## २४ तास सेवा

नऱ्हे मानाजी नगर परिसरातील साईरत्न व कुमार ओमकार सोसायटी या इमारतींना जाणारा रस्ता वादात असल्यामुळे व पूर्णतः खराब झाला असल्यामुळे नागरिकांना खूप त्रास होत होता वादी व प्रतिवादी या दोघांनाही समजावून हा रस्ता तात्पुरत्या स्वरूपाचा काल तयार करून घेतला





तुमच्या समस्येचे मूळ शोधून ताबडतोब उपाय करण्याचा

# "मोरे पॅटर्न"!!!

# "एकच कॉल प्रॉब्लेम सॉल्व्ह "

# भूपेंद्रभाऊ मोरे

नळाला पाणी नाही, ड्रेनेज रस्त्यावर वाहत आहेत, याशिवाय विविध समस्यांनी त्रस्त आहोत, पण करणार काय?? ह्या समस्या सोडवण्यासाठी या भूपेंद्रभाऊंच्या नागरी जनता संवाद अभियान'मध्ये'भूपेंद्रभाऊ मोरे यांचा जनता दरबार 'नऱ्हे परिसरातील विविध नागरी व इतर समस्या सोडवण्यासाठी नागरिकांना प्रश्न मांडण्यासाठी हक्काच व्यासपीठ.
नऱ्हे परिसरात निर्माण होत आहे. नागरी समस्यांची उकल करण्यासाठी.
सामाजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे यांनी आठवड्यातील प्रत्येक रविवारी
जनता दरबाराचे आयोजन केले आहे.





















# लोकोपयोगी उपक्रम

प्रभागातील नागरीकांना अन्न, वस्त्र, निवारा याशिवाय लागणाऱ्या सेवा तसेच विविध अडचणींचा सामना करावा लागतो. यासाठी विविध उपक्रम, आरोग्य शिबीरे उभी करून त्यातून सहाय्य केले जाते.



















ग्रामपंचायत, नऱ्हे

ता. हवेली, जि. पुणे – ४११ ०४१

www.gramchaitanya.co.in · E-mail : narhegp@gmail.com

श्री. बी. आर. गायके, ग्रामविकास अधिकारी — श्री. सागर सत्यवान भुमकर, उपसरपंच — श्रीमती मिनाक्षी ..., सरपंच

जावक क्र.: ०८३/२०२१

दिनांक : २२/०...

प्रति,
श्री.भुपेंद्र मुरलीधर मोरे,
सरचिटणीस पुणे शहर राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस,
पुणे.

विषय – मागण्या पुर्ण करणेबाबत.

संदर्भ – आपले ग्रामपंचायत दप्तरी दाखल निवेदन दि. २२/०६/२०२१

महोदय,

वरिल विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते कि, संदर्भिय निवेदना नुसार आपण केलेल्या मागण्या संदर्भात ग्रामपंचायत नऱ्हे कार्यरत असुन, आपण निवेदनामध्ये मागणी केलेली कामे ग्रामपंचायत मार्फत सत्वर मार्गी लावण्यात येतील.

कळावे.

# जन आक्रोश आंदोलन

नोटबंदीच्या ५० दिवसानंतरही नागरीकांना वेठीस धरणाऱ्या विरोधी सरकारचा निषेध करण्यासाठी जनआक्रोश आंदोलन परिसरातील नागरीकांना घनकचरा, रस्ता, पाणी, ड्रेनेज, नाले साफसफाई याबाबत होणारा त्रास जन आक्रोश आंदोलनातून समोर आला व त्याला एक दिवसात यश आले.

सेवा संकल्प विकास









# शिवजयंतीचे मोठ्या उत्साहात आयोजन

संपुर्ण सिंहगड रोड परिसरातील सर्वात मोठी शिवजयंती भुपेंद्रजी यांच्या शिवराज्य समुहातर्फे दरवर्षी आयोजित केली जाते. त्यातून शिवजन्मोत्सव सोहळा पाहण्यासाठी पुण्याच्या कानकोप-यातून लोक येतात. या शिवजयंती मध्ये देखावे, व्याख्याने, पालखी, कलाप्रदर्शन व सत्कार समारंभ आदींचा समावेश असतो.

सेवा संकल्प विकास















नऱ्हे गावातील सिमेंटच्या रस्त्यांचे खड्डे बुजविले

उत्कृष्ट दर्जाचे रस्ते करण्याची मागणी : महापालिकेला आली जाग

लोकमत इम्पॅक्ट

## रस्ते आंदोलन

न–हे येथील मानाजीनगर रस्त्यावर मोठे खड्डे पडले होते. या खड्ड्यांचा वाहनचालकांना त्रास होत होता. याबाबत भुपेंद्रजी यांनी महानगरपालिकेकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्याची दखल घेऊन खड्डे बुजविण्यात आले.





## छत्रपती
## संभाजी महाराज जन्मोत्सव सोहळा

हिंदवी स्वराज्याचे दुसरे छत्रपती
श्रीमंत छत्रपती संभाजी महाराज यांच्या
जन्मोत्सवाचे औचित्य साधून अनेक कार्यक्रमांचे
आयोजन करण्यात आले. तसेच मौजे
जांभळी येथे छत्रपती संभाजी महाराजांची
७ फूटी पूर्णाकृती भेट देण्यात आली.

सेवा
संकल्प
विकास









## छत्रपती
## संभाजी महाराज जन्मोत्सव सोहळा

स्वराज्याचे दुसरे छत्रपती संभाजी महाराज
यांचा जन्मोत्सव सोहळा
शिवराज्य समुह पुणे शहर तर्फे
मोठ्या दिमाखात साजरा

सेवा
संकल्प
विकास








## स्वप्नपूर्ती महिला फाऊंडेशन

महिलांना आर्थिक स्वावलंबी करण्यासाठी भुपेंद्रजी यांनी स्वप्नपुर्ती महिला फाऊंडेशनची स्थापना केली आहे. त्यातून महिलांना स्वंयरोजगार करण्यासाठी विविध शिबिराचे आयोजन केले जाते. तसेच ५० हून अधिक कोर्सेस शिकविले जातात. यातून आजपर्यंत हजारो महिलांनी लाभ घेऊन स्वत:चे संसार उभारले आहेत.

सेवा
संकल्प
विकास







## सीसीटीव्ही हस्तांतरण सोहळा

गोकुळनगर परिसरात चो-यांचे प्रमाण वाढले होते. त्यामूळे नागरिकांमध्ये भितीदायक वातावरण निर्माण झाले होते. तेंव्हा, गोकुळनगर परिसरातील नागरिकांच्या सुरक्षेचा विचार करुन आणि चो-या रोखण्यासाठी कायमस्वरुपी सीसीटीव्ही संच बसविण्यात आला.

सेवा
संकल्प
विकास











## समाजातील दुर्बल घटकांना न्याय मिळवून देण्यात कायम अग्रेसर

दोन वर्षापूर्वी घरात सिलिंडर स्फोट होवून सर्व संसार उघड्यावर पडला. सर्व संसार जळून खाक झाला. कंपनीच्या लोकांना भेटून काही मदत मिळेल या आशेवर दोन वर्ष निघुन गेली. पण हे कुटुंब माझ्या ऑफीसला आल्यावर संपूर्ण विषय समजून दुसऱ्याच दिवशी एजन्सीवर पोहोच झालो. पुढील तीन आठवड्यात त्यांना योग्य ती मदत मिळवून दिली.

## एचडीएफसी बँकेचा काळाबाजार उघड

लोन धारक व्यक्त्ती मयत झाली असता त्यांच्या पत्नीस कोणताही रोजगार नसताना त्यांच्यासाठी काही रक्कम सेव्हिंग म्हनुन होती. एचडीएफसी बँक कल्पना असतानाही वारंवार ईएमआय चे हप्ते कट करीत होती. सदर तक्रार निवारण करून घेतली.











# महा ई सेवा केंद्राचे उद्घाटन

नागरिकांना सर्व प्रकारचे दाखले काढण्यासाठी अनंत अडचणी येत असतात. तसेच नागरिकांचे पैसे व वेळ वाया जातो. म्हणून नागरिकांना तात्काळ सेवा देण्यासाठी महाईसेवा केंद्राची भुपेंद्रजी यांनी सुरुवात केली आहे.








# दुकानदार व विक्रेत्यांसाठी आंदोलन

नऱ्हे आणि धायरी परिसरातील दुकानदार, मालक यांच्या समस्या व प्रश्न सोडविण्यासाठी तात्काळ पाऊलं उचलले. त्यासाठी पान शॉप मालक यांच्या समवेत पोलिस स्टेशन मध्ये जाऊन पोलिसांना समस्यांचे निवेदन दिले.

सेवा संकल्प विकास











## एम.एस.ई.बी. आंदोलन

वीजपुरवठा खंडित झाल्यामूळे सर्वसामान्य नागरिक हवालदिल झाले होते. भुपेंद्रजी यांनी ही समस्या सोडविण्यासाठी एमएसईबी च्या ऑफिस मध्ये जाऊन अधिका-यांना निवेदन दिले.

















## गणेशोत्सवादरम्यान गणेश मंडळांस सदिच्छा भेट

अखंड महाराष्ट्राचे आराध्य दैवत
गणेशोत्सवादरम्यान अनेक मंडळांना भेट देवून
त्यांना असणाऱ्या समस्या
तसेच सदिच्छा भेट देवून सामाजिक बांधिलकी
जपण्याचे अविरत कार्य




























## होम मिनिस्टर

महिलांसाठी
नमस्कार वहिनीसाहेब
होम मिनिस्टर सोहळा व
पहिल्यांदाच महिला पोलिस कर्मचारी
वर्गासाठी होम मिनिस्टर सोहळा
आयोजित करण्यात आला होता.

सेवा
संकल्प
विकास









## शैक्षणिक साहित्यास आवाहन आणि साहित्य वाटप.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वर्धापनदिनानिमित्त शिवराज्य समुहातर्फे गोरगरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी मदतीचे आवाहन केले होते. त्यास समाजा बद्दलची आपली बांधिलकी व माणुसकी दाखवून अनेकांनी पुढे येऊन जसे जमेल ती शैक्षणिक मदत केली. ती मदत त्या गरीब विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवण्याची तजविज केली. त्यातून गरीब मुलांचे शैक्षणिक वर्ष वाचण्यास मदत झाली.













# लहान मुलांसाठी चित्रकला स्पर्धा

लहान मुलांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी भुपेंद्रजी यांनी भव्य चित्रकला स्पर्धेचे आयोजन केले होते.या स्पर्धेत हजारो विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला आहे. स्पर्धेतील विजेत्यांना बक्षिस देऊन त्यांच्या पाठिवर शाब्बासकीची थाप दिली आहे.

सेवा संकल्प विकास










# जनआरोग्य आंदोलन

नऱ्हे आणि परिसरात कच–याची गंभीर समस्या आहे. ही समस्या तात्काळ सोडवून नागरिकांचे आरोग्य चांगले रहावे म्हणून जनआरोग्य आंदोलन करण्यात आले होते. त्यातून न–हे आणि परिसरातील नागरिकांच्या कचरा समस्येबाबत जनजागृती करुन प्रशासनाचे लक्ष वेधून घेतले.














# महिला फाऊंडेशन वर्धापन दिनानिमित्त हळदी कुंकू समारंभ

स्वप्नपुर्ती महिला फाऊंडेशन यांच्या वतीने हळदी–कुंकू कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. त्यातून महिलांना एक प्रकारे व्यासपीठ उपलब्ध करुन दिले होते. या ठिकाणी महिला एकमेकींच्या विचारांची देवाणघेवाण करतात. विरंगुळा, मनोरंजन म्हणून ही महिलांच्या जीवनात या कार्यक्रमाचे महत्व अनन्यसाधारण होते.





# कोरोना काळात गरजुंसाठी मोफत फूड पॅकेट्स वितरण

स्वप्नपुर्ती महिला फाऊंडेशन यांच्या वतीने
हळदी-कुंकू कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.
त्यातून महिलांना एक प्रकारे व्यासपीठ उपलब्ध
करुन दिले होते. या ठिकाणी महिला
एकमेकींच्या विचारांची देवाणघेवाण करतात.
विरंगुळा, मनोरंजन म्हणून ही महिलांच्या
जीवनात या कार्यक्रमाचे महत्व
अनन्यसाधारण होते.

सेवा संकल्प विकास



नागरीकांच्या समस्या समजुन घेऊन त्यातून त्यांना योग्य ती
उपाययोजना करून देण्यासाठी परिसरातील कमाल नागरीकांपर्यंत
जावून त्यांच्या गाठीभेटी घेऊन संबंधित विभागातील
अधिकाऱ्यांसोबत योग्यप्रकारे पाठपुरावा करून नागरीकांच्या
समस्यांना निराकरण करण्यात कमाल यश....
नागरीकांचे आशिर्वाद हेच आमचे यश.....!

सेवा
संकल्प
विकास




नागरीकांच्या समस्या समजुन घेऊन त्यातून त्यांना योग्य ती
उपाययोजना करून देण्यासाठी परिसरातील कमाल नागरीकांपर्यंत
जावून त्यांच्या गाठीभेटी घेऊन संबंधित विभागातील
अधिकाऱ्यांसोबत योग्यप्रकारे पाठपुरावा करून नागरीकांच्या
समस्यांना निराकरण करण्यात कमाल यश....
नागरीकांचे आशिर्वाद हेच आमचे यश.....!

सेवा
संकल्प
विकास